# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, 22617969 फॅक्स – 22690007 2692102.

E-mail : desk3@dte.org.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


**अतितात्काळ/कालमर्यादित**

क्रमांक:- ३/तंशिसं/२०१३/ 11
दिनांक :- २१/०१/२०१४

प्रति,
सहसंचालक,
विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर

**विषय :- मराठा आरक्षणाबाबत प्रवेशीत विद्यार्थी व उत्तीर्ण विद्यार्थ्यांची सांख्यिकी माहिती**

संदर्भ :- शासन पत्र क्र.मराठा २०१३/प्र.क्र.७६-२०१३/आस्था-२,उच्च् व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई

उपरोक्त् विषयाबाबतचे सोबत जोडलेले संदर्भाधीन पत्र पहावे. संदर्भीय पत्रास अनुसरुन आपणांस असे कळविण्यात येते की, राज्यातील मराठा समाजाला इतर मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट करण्यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीने राज्यातील **सर्व तंत्रशिक्षण संस्थांमधील सर्व विद्याशाखांमध्ये सन २०१०-११,२०११-१२,२०१२-१३ व २०१३-१४ या शैक्षणिक वर्षामध्ये मराठा समाजातील** किती विद्यार्थी/विद्यार्थीनी **प्रवेश घेतला व उत्तीर्ण झाले** याबाबतची माहिती आपल्या अखत्यारितील सर्व संस्थांना भरण्यास सूचित करावे-ही माहिती भरण्याची सुविधा संस्थेच्या लॉगइन मध्ये केलेली आहे. संस्थेने लॉगइन करुन ENTER MARATHA CANDIDATE DETAIL'S या लिंकवर सदरची सर्व अभ्यासक्रम व विद्याशाखेची माहिती भरावी ही माहिती शासनास त्वरीत सादर करावयाची असल्यामुळे दि.२४/१/२०१४ पर्यंत भरून पूर्ण करावी.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा., मुंबई

---

**अतितात्काळ/कालमर्यादित**

पृष्ठांकन/तंशिस/प्राकाना/शैवि-२/२०१३/ 217
दिनांक:- 21 JAN 2014

प्रति,
संचालक/प्राचार्य
पदवी, पदव्युत्तर व पदविका तसेच तस्सम संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

मराठा आरक्षणाबाबत प्रवेशीत विद्यार्थी व उत्तीर्ण विद्यार्थ्यांची सांख्यिकी माहिती ऑनलाईन पध्दतीने संकेतस्थळावरुन भरण्याबाबतची कार्यवाही उपरोक्त पत्राप्रमाणे तात्काळ करावी.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय,
नागपूर.